पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८
क्रमांक लेखा /२८/कावी/ ५८ /२०२३
दिनांक: ०४/०८/२०२३

विषय – दिनांक ३० जून रोजी सेवानिवृत्ती झालेल्या/होणाऱ्या कर्मचा-यांना लगतच्या १ जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन सेवा निवृत्ती वेतन निश्चित करण्याबाबत.

## परिपत्रक

विषयांकित बाबत महाराष्ट्र शासन, वित्त विभागाचे परिपत्रक वेतन २०२३-प्र.क्र .१३ / सेवा ३ दिनांक २८ जून २०२३ अन्वये दिनांक ३० जून रोजी सेवा निवृत्त झाले आहेत व ज्यांनी मागील १२ महिन्यांची अर्हताकारी सेवा केलेली आहे अशा सर्व सेवानिवृत्त झालेल्या / होणाऱ्या कर्मचा-यांना काल्पनिक ( Notional) वेतनवाढ विचारात घेवुन त्यांचे सेवानिवृत्ती वेतन सुधारीत करणेकामी कळविले आहे. उक्त शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील पात्र कर्मचा-यांना वेतनवाढ मंजुर करणेकामी खालील मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

आपले विभागातून दिनांक ३० जून रोजी सेवानिवृत्ती झालेल्या पात्र कर्मचा-यांचे अर्ज प्राप्त करून घ्यावेत. कर्मचा-यांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित कर्मचा-यांना लगतच्या १ जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ मंजूर करण्यात यावी. वेतनवाढीसह प्रकरण सुधारीत सेवानिवृत्तीवेतन सुधारीत करणेकामी लेखा विभागाकडे सादर करावे. लेखा विभागाने संबंधितांना सुधारीत सेवानिवृत्ती विषयक लाभ लागु करावेत. सदर लाभ सुधारीत करण्यात आल्या नंतर त्यांनी अर्ज केलेल्या दिनांकाच्या मागील तीन वर्षाची थकबाकी अथवा त्यांच्या सेवानिवृत्तीचा दिनांक यापैकी जे कमी असेल इतकी थकबाकी संबंधितांना देण्यात यावी.

दिनांक ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या ज्या कर्मचा-यांची सेवानोंद पुस्तके लेखा विभागात आहेत. त्यांची सेवानोंद पुस्तके लेखा विभागातून प्राप्त करुन घेवून वरील कार्यवाही त्वरीत करावी व कार्यवाही पूर्ण झालेवर लेखा विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावित. सेवानोंद पुस्तके विभागाकडे असल्यास परिपत्रकात नमुद केलेली विभागस्तरावर करावयाची कार्यवाही पूण करुन लेखा विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावीत

तसेच यापुढे ३०जुन रोजी सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचा-यांना १ जुलै ची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन सेवानिवृत्ती वेतन निश्चिती करण्यात यावे

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

प्रति,

सर्व संबंधित विभाग
कार्यवाहिसाठी

प्रत - १) प्रशासन विभाग ३) पि.चि .मनपा कर्मचारी महासंघ
२) मु.ले.प विभाग ४) पि.चि.मनपा सेवा निवृत्त अधिकारी व कर्मचारी असोसिएशन